


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : २७३ वा    बुधवार    दि. ०१ जानेवारी २०२५    पृष्ठ ८    किंमत ३रुपये

# झूकत नव्हताच! पण त्याने आता टाकल्या नांग्या!...

## बुलढाण्यात एसपी राहून पुण्यात गेलेले पोलीस उप महानिरीक्षक सारंग आवाड यांच्या समोर वाल्मिकी कराड झुकलाच!

**वृत्तसंस्था/बीड**

बीड मधील मस्सजोगचे संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात पोलिसांच्या रडारवर असलेले आणि बीड येथे पवन ऊर्जा कंपनीच्या अधिकाऱ्यांना खंडणीच्या गुन्ह्यात आरोप असलेली वाल्मिकी कराड बाबत सर्वात मोठी अपडेट समोर आली आहे. बुलढाण्यात पदोन्नती मिळाल्यावर पुण्यात पोलीस उप महानिरीक्षक म्हणून सारंग आवाड यांनी जबाबदारी सांभाळत असतांना या आरोपीची कसून चौकशी केल्याने वाल्मिकी कराड पोलिसांना शरण आला आहे.ही बाब बुलढाणा साठी देखील गौरवाची म्हणावी लागेल. बुलढाणा येथे एसपी अरविंद चावरीया यांची बदली झाल्यानंतर २० ऑक्टोबर २०२२ पासून श्री आवाड यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली होती. चांगल्या प्रकारे त्यांनी कर्तव्य निभावले. दरम्यान त्यांना पदोन्नती मिळाली आणि ते पुण्यात पोलीस उपमहानिरीक्षक म्हणून कार्यभार सांभाळत आहेत.दरम्यान बीड





हत्याकांड गाजत असल्याने, आवाड यांनी या गुन्ह्यात महत्त्वाची भूमिका निभावली असून कठोर चौकशी केली असता,आरोपीने शरणागती पत्करली. ९ डिसेंबर २०२४ रोजी मस्सजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणात तपास सुरु असतानाच वाल्मिक कराड हे नाव समोर आले. वाल्मिक कराडच्या सांगण्यावरुनच ही हत्या झाल्याचा आरोप विरोधकांनी केला, त्यानंतर बीडमधील कराडच्या दहशतीचे, अवैध धंद्यांचे, गुन्हेगारीचे असंख्य किस्से समोर येऊ लागले. राज्याच्या हिवाळी अधिवेशनात संतोष देशमुख हे प्रकरण प्रचंड गाजले, ज्यामध्ये या हत्याकांडाचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड असल्याचे सांगत विरोधकांनी रान पेटवले.राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या आश्रयानेच वाल्मिक कराडची ही गुंडगिरी सुरु असल्याचे आरोप करत विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली.याच दरम्यान बीड येथे पवनऊर्जा कंपनीच्या अधिकाऱ्यांना खंडणी मागितल्या प्रकरणी वाल्मिक कराडवर गुन्हा नोंद करण्यात आला. तेव्हापासून वाल्मिक कराड यांचा शोध सुरु होता.गेल्या काही दिवसांपासून सीआयडीने वाल्मिक कराडच्या कुटुंबियांचीही चौकशी सुरु केली होती, तसेच त्याची बँक खाती गोठवून चांगलीच कोंडी केली होती. सीआयडीने फास आवळल्याने वाल्मिक कराड कोणत्याही क्षणी शरण येईल, असं बोलले जात होते. अखेर त्याला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले असून या प्रकरणात आता पुढे काय कारवाई होणार? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# नायलॉन मांजाला ढिल नाहीच प्लास्टिक पिशवी विक्री, साठवणूकीवर दंडात्मक कारवाई!

**जनसंचलन/बुलढाणा**

बंदी असलेल्या मांजा विक्री व साठवणुकीबद्दल नगरपालिकेने २ दुकानदारांवर आज कारवाई करत प्रत्येकी एक हजार रुपये दंड ठोठावला तर प्लास्टिक पिशवी संदर्भात देखील सनी डेली निड्स येथे ५ हजाराची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.परंतु कागदी चहाचे कप, प्लास्टिक पिशव्या व संक्रांतिदरम्यान उडणाऱ्या पतंगां साठी लागणारा बंदी असलेला मांजा जप्तीच्या कारवाईची अंमलबजावणी नियमित राहील का?हा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. पक्षी, प्राण्यांसह मनुष्याच्या जीवाला धोकादायक ठरणाऱ्या चिनी, प्लास्टिक आणि नायलॉन मांजांच्या विक्रीला राज्य सरकारने बंदी घातली आहे. मात्र तरीही अशा जीवघेण्या मांजाची छुपी विक्री, वापर आणि साठवणूक केली जात असल्याने यंत्रणा सतर्क झालीआहे. मकरसंक्रांती जवळ येत असून पतंग उडविण्याचे देखील प्रमाण वाढले आहे. यामुळे बाजारात बंदी असलेला मांजा विक्रीसाठी आणला जात आहे. विक्री करणाऱ्यांवर अनेकदा कारवाया झाल्यानंतर देखील अगदी सर्रासपणे मांजा विक्री केला जात आहे.आज मात्र नगरपालिकेने कारवाई केली.प्लास्टिक पिशव्या वापरण्यावर,




विक्री व साठवणुकीवर सुद्धा बंदी आहे. चहाच्या कागदी कपावर बंदी असल्यावरही शहरात व जिल्ह्यात कागदी कपांचा वापर जोरदार सुरू आहे.दरम्यान यावरही कारवाईचा बडगा उगारण्याचा इशारा नगरपालिकेच्या वतीन देण्यात आला आहे

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सकल मराठा मोर्चाने चिखली दणाणली!

## संतोष देशमुखांना न्याय मिळवून देण्यासाठी जनसागर लोटला!




**जनसंचलन/चिखली**

आज संतोष देशमुखांना न्याय मिळवून देण्यासाठी चिखलीत सकल मराठा समाजाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला असून शेकडोंचा जनसागर लोटल्याचे चित्र दिसून आले. संतोष देशमुख यांच्या आरोपीला कठोर फाशीची शिक्षा झालीच पाहिजे! या मागणीने परिसर दणाणून गेला होता. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेला आज अनेक दिवस झालेत. या घटनेवरून मस्साजोगसह राज्यातील नागरिकांनी आणि वेगवेगळ्या संघटनांनी संताप व्यक्त केला आहे, या घटनेतील आरोपी अद्याप मोकाट फिरत आहेत, त्याच्या निषेधार्थ आज चिखली मध्ये सकल मराठा समाजाच्यावतीने मोर्चा काढण्यात आला आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चात लोक हातामध्ये छोटे-छोटे पोस्टर घेऊन संतोष देशमुख यांना न्याय देण्याची मागणी करत होते, शेकडो लोक रस्त्यावर उतरल्याचे दिसून आले आहे.

# मलकापूरात जनता दरबार गाजला!...

## आमदार चैनुसूख संचेती यांची विकासाकडे वाटचाल!

**जनसंचलन/मलकापूर**

आमदार चैनुसूख संचेती यांची विकासाकडे वाटचाल सुरू असून त्यांनी भरविलेला जनता दरबाराने विकासात्मक चाहूल लागली आहे! मलकापुर येथे भातृ मंडळ आयोजित भव्य जनता दरबार हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात मलकापुर तालुक्यातील जनतेच्या समस्या ऐकण्यासाठी तसेच त्या सोडवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच जनतेचे प्रश्न तातडीने सोडवण्याच्या दृष्टीने ठोस उपाययोजना करण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला. आमदार चैनसुखजी संचेती यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. त्यांनी आपल्या मनोगतातून जनता दरबार हा लोकांच्या




समस्या सोडवण्याचा आणि विकासकामांना गती देणारा प्रभावी मार्ग असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी शेतरस्त्यांचे उत्कृष्ट जाळे, शेतशिवाराचे समृद्धीकरण, प्रत्येक घरात वीज, उत्तम आरोग्यसेवा, आणि दवाखान्यांच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्याच्या उद्दिष्टांवर भर दिला.यावेळी अनेक शासकीय कर्मचारी, पदाधिकारी, व स्थानिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाने स्थानिक जनतेत उत्साह निर्माण केला असून त्यांच्या समस्या तातडीने सोडवण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

**जनसंचलन/बुलढाणा**

अलिकडच्या काळात देशाची तरूण पिढी वाचन संस्कृतीपासुन दुरावत असल्याचे दिसत आहे. या पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी दि. १ ते १५ जानेवारी या कालावधीत ङ्गवाचन संकल्प महाराष्ट्राचाफ उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यानिमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम विद्यापिठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालय तसेच शासकीय ग्रंथालय यांच्या माध्यमातून दि.१ ते १५ जानेवारी दरम्यान राबविला जाणार आहे. या अभिनव उपक्रमांतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय बुलढाणा येथे ग्रंथप्रदर्शन, सामुहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांमध्येही वाचन पंधरवडा राबविण्यात येणार आहे. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथील ग्रंथालयामध्ये आजमितीस सुमारे १ लक्ष ६० हजार ग्रंथसंपदा उपलब्ध असून त्यामध्ये मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेतील विविधांगी कथासंग्रह, कादंबरी, संदर्भग्रंथ, ललित वाड:मय, स्पर्धा परीक्षा ग्रंथ इत्यादी ग्रंथसंपदा उपलब्ध असून वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमामध्ये जास्तीतजास्त वाचकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनिल पाटील यांनी केले आहे.

# गुरुवारपासून जिल्हास्तरीय चाचा नेहरु बाल महोत्सव



**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयामार्फत शासकीय व स्वयंसेवी बालगृहातील मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी जिल्हास्तरीय चाचा नेहरु बाल महोत्सव-२०२४-२५ चे आयोजित करण्यात आले आहे. हा महोत्सव दि. २ ते ४ जानेवारी २०२५ या कालावधीत शरद कला महाविद्यालय, चिखली रोड बुलढाणा येथे होणार आहे. या महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल ज्ञा. डिघुळे यांनी केले आहे.



# चिखली पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष इफ्तेखार खान उर्फ-राजा भैय्या

**सुखा- दुःखात धावुन येणारे जिवलग मित्र,
माझ्या प्रगतीच्या वाटचालीस प्रत्येक पाऊलावर शाबासकी देऊन प्रोत्साहित केले. वेळ प्रसंगी चुकलो तर मोठया भावासारखे उपदेश देणारे, खळखळत्या मुक्त संचार करणाऱ्या झऱ्यासारखे निः स्वार्थ निर्मळ-स्वच्छ मनाचे, शांत, संयमी, आपल्या अद्वितीय लिखाणाच्या जोरावर एका पेपरचे प्रतिनिधी पासुन संपादक तथा चिखली पत्रकार संघाचे सन्मानाचे अध्यक्ष पद बिनविरोध भूषविणारे विदर्भ का कासिद साप्ताहिक चे संपादक तथा डिजिटल मीडिया अल्पसंख्यांक विंग चे जिल्हा अध्यक्ष इफ्तेखार खान उपाख्य राजा भैय्या यांच्या वाढदिवसानिमित्त मनस्वी शुभेच्छा!**

ज्या प्रकारे इतिहासकार महापुरुषांच्या कार्याला आपल्या लेखणीद्वारे अजरामर करतात. त्याच प्रमाणे लेखक, पत्रकार आपल्या भारदस्त लिखाणाने समाज प्रबोधन करण्याचे निस्वार्थ काम करतात. चिखली शहरातील नामवंत पत्रकारांच्या यादीत गणल्या जाणारे इफ्तेखार खान उर्फ राजा भैय्या यांनी उच्च शिक्षणानंतर वयाच्या २५ व्या वर्षी पोटापाण्याचा प्रश्न मिटावा म्हणुन कॉम्प्युटर जॉब वर्क सुरू केले. मराठी माध्यमातून शिक्षण झालेले असतांनाही इंग्रजी, हिंदी, उर्दू भाषेवर प्रभुत्व असल्याने समाजाप्रती प्रबोधनाचे दायित्व स्विकारून समाजात घडणाऱ्या चांगल्या, वाईट घटना व प्रशासनाच्या कार्यावर परखड विचार आपल्या लेखणीतून मांडण्यासाठी प्रथमच दैनिक नवभारत वृत्तपत्रात चिखली तालुका प्रतिनिधी म्हणुन काम केले.उर्दु दैनिक शम-ए-रहबर या उर्दू भाषिक वृत्तपत्रात ही सामाजिक घटनांना वाचा फोडण्याचे काम केले. सुप्रसिद्ध वृत्तपत्रात काम करतांना दडपणाची जाणीव होताच या वृत्तपत्राला सोडचिठ्ठी देत आपले मुक्त विचार मांडण्यासाठी स्वतःचे विदर्भ का कासिद साप्ताहिक सुरू करून राजकिय, सामाजिक चांगल्या, वाईट निर्णयांना जगासमोर दिलख-ुलासपणे मांडण्याचे कार्य अविरत करीत आहे. अल्पावधीतच चिखली तालुका पत्रकार संघाचे सदस्य, सचिव, अध्यक्ष अशी महत्व-ाची पदे भूषविली आजही पत्रकार बांधवांच्या व अन्यायग्रस्त नागरिकांना आपल्या साप्ताहिक द्वारे व प्रत्यक्षपने भेटून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असतात. राजा भैय्या यांच्या सामाजिक व राष्ट्रहिताच्या नवनवीन कल्पना व कमालीचे संघटन कौशल्य पाहता नवयुवक त्यांना आपले आदर्श मानतात.

शासनाच्या चुकीच्या निर्णयाचा विरोध करण्यासाठी शाहीन बाग धरतीवर चिखली शहरात साखळी उपोषण असो किंवा हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निमित्त विक्रमी ५२३ लोकांचे रक्तदान करून घेण्याचे शिबिर असो अश्या सामाजिक व राष्ट्र हिताच्या कार्यात राजा भाई यांचा वाटा मोलाचा असतो.



चिखली पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, सचिव साप्ताहिक विदर्भ का कासिद चे संपादक तसेच डिजिटल मीडिया अल्पसंख्यांक विंग चे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष इफ्तेखार खान उर्फ राजा भैय्या यांच्या हस्ते सदैव सामाजिक व देश हिताचे कार्य घडत राहो ह्याच सदिच्छा...

लेखक
...मुख्तार शेख....

# वाहन धारकांनी HSRP नंबर प्लेट वाहन वितरकांकडून बसवून घेण्याचे आवाहन





जनसंचलन/बुलढाणा

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशान-ुसार राज्य शासनाने दिनांक १ एप्रिल २०१९ पासून नवीन उत्प-ादीत होणाऱ्या वाहनांना HSRP नंबर प्लेट बसविण्याबाबत निर्देश जारी करण्यात आले आहे. त्यानुसार दि. १ एप्रिल २०१९ नंतर उत्पादित होणाऱ्या वाहनांना HSRP नंबर प्लेट बसविणे बंधनकारक असून वाहन वितरकांद्वारे ही नंबर प्लेट बसविण्यात येणार आहे. तरी सर्व वाहनधारकांनी नंबर प्लेट वाहन वितरकांकडून बसवून घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी केले आहे. वाहनाचे नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना बसविण्याचे शासनाने निर्देश दिले आहे. त्यानुसार उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बुलढाणा करीता झोन ३ मध्ये M/s FTA HSRP Solution Ptv Ltd/ ही एजन्सी HSRP असून बुकींग पोर्टल http://maharashtrahsrp.com हा आहे. या करिता नेमण्यात आलेल्या पुरवठाराची यादी उप प्रादेशिक परिवहन कर्यालयाच्या सुचनाफलकांवर लावण्यात आली आहे. सर्व वाहनधारकांना याव्द-ारे सुचित करण्यात येते की, दि. १ एप्रिल २०१९ पुर्वी नोंदणी झालेल्या वाहनांनी बसविण्याची कार्यवाही त्वरीत करावी. याकरीता ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा वरील लिंकवर देण्यात आली असून अर्जाचे शुल्क भरणा ऑनलाईन करावा, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे

# अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या दोन गटांत हाणामारी...

जनसंचलन/ नांदुरा

शिकवणी वर्गाबाहेर अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या दोन गटांत तुफान हाणामारी झाल्याची घटना ३० डिसेंबर रोजी शहरातील स्टेट बँकेपासून काही अंतरावर असलेल्या मानकर अपार्टमेंटजवळ घडली. या घटनेत एक सतरा वर्षांचा विद्यार्थी जखमी झाला. त्याचे डोके फोडल्याने त्याला त्याच्या सहकाऱ्यांनी उपचारासाठी दवाखान्यात नेले. जखमी झा-लेला मुलगा हा कोठारी शाळेतील बारावीचा विद्यार्थी असल्याची माहिती त्याच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी दिली. विशेष म्हणजे हा प्रकार परिसरातील नागरिक घराबाहेर येऊन उघड्या डोळ्यांनी पाहत होते. मात्र, कुणीही पुढे येऊन दोन गटांतील ही हाणामारी थांबवण्याचे धाडस दाखवले नाही. ही बाब नित्याचीच आहे, असे म्हणत अनेकांनी बघ्याची भूमिका घेत आहे.



# तब्बल ९ दुचाकी चोरून केली धूम! अन् आता पोलीस ठाण्यात बनला मासूम!

जनसंचलन/बुलढाणा

चोरी करणं हा कायद्यानं गुन्हा आहे. जर तुम्ही पकडला गेलात तर तुम्हाला गंभीर शिक्षा होऊ शकते. मात्र हे माहित असताना देखील काही लोकं झटपट पैसे कमावण्याच्या इराद्यानं चोरीचा रस्ता निवडतात. असाच रुपेंद्र नरसिंग पट्ठे रा.संत रोहिदास नगर मलकापूर जि. बुलढाणा याने तब्बल ९ दुचाकी चोरून धूम केली खरी पण अखेर खामगाव पोलिसांच्या हाती लागल्याने आता त्याला जेलचा प्रवास जड जाणार आहे.भरदिवसा ऐन रहदारीच्या रस्त्यावरील चौकातून दुचाकींचे लॉक तोडून या चोरट्याने ९ दुचाकी लंपास केल्या आहेत.या चोरट्याचा शोध लावण्यासाठी



खामगावचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण पवार यांनी अधिनस्त स्वतंत्र पथक तयार केले होते. पेट्रोलिंग करत असतांना आरोपी हा त्याच्या ताब्यातील मोटार सायकल -०४-- ७२५६ ची डुब्लीकेट चावी बनवितांना मिळून आला.चौकशी दरम्यान आरोपी याने तब्बल ९ मोटार सायकली चोरल्याची कबुली दिली आहे. ही कारवाई एसपी विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. आरोपी जेलची हवा खाणार असून, खूपच मासुम दिसून येत आहे.

# विवेकानंद कृषीचा वळू, रेडा राज्यात द्वितीय

जनसंचलन/हिवरा आश्रम

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त कृषी विद्यापीठ अकोला, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा अकोला, कृषी विभाग व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ ते २९ डिसेंबर २०२४ दरम्यान विद्यापीठ क्रीडांगण अकोला येथे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन ॲग्रोटेक २०२४ आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात विवेकानंद आश्रमाच्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाच्या वतीने वळू व रेडा यांना समाविष्ट करण्यात आले होते. थारपारकर जातीचा वळू जाफ्राबादी रेडा या दोन्ही पशूनी प्रदर्शनामध्ये द्वितीय क्रमांक पटकावला आहे. सुदृढता, वय, देखणेपणा वजन, या वैशिष्ट्यांची पूर्तता केल्यामुळे त्यांचा द्वितीय क्रमांक आला. आश्रमाच्या कृषी व कृषी व्यवस्थापन महाविद्यालयाचा पशुसंवर्धन विभाग समृद्ध असून त्यात गीर, साहिवाल, लालकंधार, खिल्लार, थारपारकर, जाफ्राबादी, मुन्हा, जर्सी, हॉल्स्टीन फ्रिझियन, देवणी, तसेच गावरान इत्यादी जनावरांच्या प्रजाती उपलब्ध आहेत. आश्रमाच्या हरिहरतीर्थावरील गोशाळेत या सर्व जातींचे संवर्धन केले जात आहे. कृषी महाविद्यालयाच्या प्रा. मीनाक्षी कडू, प्रा. विष्णू सोमटकर यांनी प्रदर्शनीत सहभाग नोंदविला होता. पशुसंवर्धन विभागाच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष कालवे, प्राचार्य मंगेश जकाते यांनी

# पालकांनी मुलांच्या आहाराविषयी सजग राहावे - पल्लवी जोशी

जनसंचलन/बुलढाणा

पालकांनी मुलांच्या आहाराच्या बाबतीत सजग राहावे तसेच त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी योग्य आहार द्यावा, असे प्रतिपादन प्रसिद्ध आहार तज्ज्ञ डॉ. पल्लवी जोशी यांनी केले. विवेकानंद गुरुकुंज बालक मंदिराच्या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. स्नेहसंमेलन हे मुलांच्या सांस्कृतिक, भावनिक विकासासाठीचे व्यासपीठ आहे, असे मत डॉ. सीमाताई आगाशे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर विवेकानंद गुरुकुंज बालक मंदिराच्या मुख्याध्यापिका रत्नावली काचकुरे उपस्थित होत्या. दि. युथ लीग रिक्रिएशन सेंटरद्वारा संचालित विवेकानंद गुरुकुंज बालक मंदिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करून करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत श्रावणी गवई, सार्थक नागपुरे, देवांशी तायडे या चिमुकल्यांच्या हस्ते करण्यात आले. संचालन अनिता धर्माधिकारी यांनी केले.

# एकाच वेळी दोन अवैध वाळू वाहतुक करणाऱ्या ट्रक वर जप्तीची कारवाई !

## उपविभागीय अधिकारी ॲक्शन मोडवर!




जनसंचलन/ देऊळगाव राजा

हॅलो बुलढाणा व दैनिक जनसंचलन ने वाळू तस्कर पुष्पा विरोधात नुकतीच बातमी प्रसारीत केली आणि यंत्रणा सावध झाली आहे. दरम्यान देऊळगाव मही ते बायगाव रस्त्यावर दि. ३० डिसेंबर ला रात्री १०.३० वाजता च्या दरम्यान, प्रा संजय खडसे उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा यांचे पथकांनी अवैध रित्या वाळूची वाहतूक करणाऱ्या प्रत्येकी ४ ब्रास चे दोन ट्रक वर जप्तीची कारवाई केली, सदर ट्रकवर क्रमांक नाहीत, सदर दोन्ही ट्रक पोलीस स्टेशन देऊळगाव राजा येथे अटकावं करून ठेवण्यात ठेवण्यात आले आहेत, दोन्ही ट्रक वर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे तसेच दोन्ही ट्रकवर क्रमांक नसल्यामुळे त्याच्यावर मोटार वाहन अधिनियमा नुसार कार्यवाही करण्यासाठी आर टी ओ यांचे कडे पाठविण्यात येणार आहे सदर पथकामध्ये प्रा संजय खडसे उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा यांची सोबत एस जी पांडव, व्ही यु कटारे, एस ए जाधव महसूल ग्राम अधिकारी, एल एन वायडे, मंडळ अधिकारी, तसेच पोलीस स्टेशन देऊळगाव पोलीस विभागाचे कर्मचारी सोबत होते. गारवा हॉटेल परिसरात व देऊळगाव मही परिसरामध्ये २४ तास पथक कार्यान्वित ठेवावे असे निर्देश तहसीलदार देऊळगाव राजा यांना देण्यात आले.

# समर्थ महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा

जनसंचलन/ देऊळगाव राजा

समर्थ कृषी महाविद्यालय, देऊळगाव राजा येथे बँकिंग क्षेत्रात कृषी पदवीनंतरच्या नोकरीबाबत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समर्थ कृषी महाविद्यालयाचे सचिव सतीश कायंदे होते, तर प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे, सिद्धेश्वर कोंधे, व्यवस्थापक संजित कदम आदी उपस्थित होते. सतीश कायंदे यांनी कृषिक्षेत्रात असणाऱ्या सरकारी नोकऱ्यांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सिद्धेश्वर काँधे यांनी कृषी विषयात पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रात असणाऱ्या नोकरी, त्यांचा अभ्यास तसेच कोणत्या नोकरीसाठी कृषी पदवी घेतलेले विद्यार्थी अर्ज करू शकतात, याबाबत सखोल मार्गदर्शन केले. आभार व संचालन रासेयोसह कार्यक्रम अधिकारी प्रा. अश्विनी जाधव यांनी केले. कार्यक्रमासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. किरण ठाकरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958